# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 08 February 2025
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक ०८ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- राज्यातल्या नदीजोड प्रकल्पांना अर्थसहाय्यासाठी वित्तीय संस्थांकडून सकारात्मक प्रतिसाद
- वाढीव मतदार प्रकरणी महाविकास आघाडीची निवडणूक आयोगाकडे चौकशीची मागणी
- रिझर्व्ह बँकेकडून रेपोदरात २५ बेसीक पॉईंटची कपात
- राज्यशासनाच्या वाङ्मय पुरस्कारांची घोषणा-ज्येष्ठ साहित्यिक रा रं बोराडे यांना विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार, तर मसापला मंगेश पाडगांवकर भाषा संवर्धन पुरस्कार

आणि

- अजिंठा नागरी सहकारी बँक घोटाळ्याप्रकरणी बँकेचे अध्यक्ष माजी आमदार सुभाष झांबड यांना पोलिस कोठडी

****

राज्यातल्या नदीजोड प्रकल्पांना अर्थसहाय्य करण्यासाठी विविध वित्तीय संस्थांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल एशियन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट, कोरियन एक्झिम तसंच एएफडी बँकेशी यासंदर्भात बैठक घेतली. मराठवाडा वॉटरग्रीड योजना, नारपार सिंचन प्रकल्प, दमणगंगा-एकदारे-गोदावरी योजनेसह समृद्धी महामार्गावरील गुणवत्तापूर्ण परिवहन व्यवस्था प्रकल्पाला अर्थसहाय्य करण्यासंदर्भात या बैठकीत चर्चा झाली. तापी रिचार्ज योजनेबाबतही मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाली असून त्यांनी या प्रकल्पाबाबत सकारात्मकता दर्शवल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

****

देशातली सर्वात मोठी औद्योगिक इकोसिस्टीम विदर्भात गडचिरोलीला केंद्रस्थानी ठेऊन तयार होत असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. काल नागपूर इथं, ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५ या औद्योगिक महोत्सवात ते बोलत होते. वर्धन लिथियमच्या ४२ हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारामुळे विदर्भात एक पथदर्शी इकोसिस्टीम तयार होत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत मतदारसंख्या वाढल्याप्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी महाविकास आघाडीनं निवडणूक आयोगाकडे केली आहे. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी काल नवी दिल्लीत घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही मागणी केली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान मतदारसंख्या ३९ लाखांनी कशी वाढली असा प्रश्न गांधी यांनी उपस्थित केला. आपल्याला या मतदार यादीबाबत माहिती देण्याची मागणी गांधी यांनी केली, ते म्हणाले...

> ***''हमने इलेक्शन कमिशन को पांच बार बोला है, की हम आरोप नही लगा रहे है। हम आपसे सिर्फ महाराष्ट्र की वोटर्स लिस्ट मांग रहे है। लोकसभा की फाईनल वोटर लिस्ट। नेम, ॲड्रेस, फोटोग्राफ। विधानसभा की फायनल वोटर लिस्ट। नेम, ॲड्रेस, फोटोग्राफ। तीनों राजनेतीक पार्टीयां, विपक्ष की पार्टीयां महाराष्ट्र की पब्लिकली आपसे सवाल पूछ रही है। मैने पार्लमेंट मे बोला, हमारे सब नेतोओं ने बोला इलेक्शन कमिशन हमे लिस्ट नही दे रही। उनकी जिम्मेदारी बनती है, की जल्दी से जल्दी लोकसभा, विधानसभा महाराष्ट्र की लिस्ट वो एन सी पी, शिवसेना अँड काँग्रेस पार्टी को पकडा दे। क्यों की हम इस इन्वेस्टीगेशन को एंड तक ले जाना चाहते है।''***

गांधी यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची तपशीलवार लेखी उत्तरं दिली जातील, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. लोकशाहीत राजकीय पक्ष हा महत्त्वाचा घटक असून त्यांच्या प्रश्नांना उत्तरं देणं तसंच त्यांची मतं आणि सूचना ऐकून घेतल्या पाहिजेत असं आयोगानं सामाजिक संपर्क माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, काँग्रेसला दिल्ली निवडणुकीत पराभवाची भीती वाटत असल्यानं राहुल गांधी विनाकारण असे प्रश्न उपस्थित करत आहेत, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राहुल गांधी यांनी पराभवाबद्दल आत्मचिंतन करावं, असा सल्ला फडणवीस यांनी दिला आहे.

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीची मतमोजणी आज होत आहे. सकाळी आठ वाजता टपाली मतदानाच्या मोजणीनं या प्रक्रियेला प्रारंभ होईल, दुपारपर्यंत सर्व ७० जागांचे कल हाती येण्याची शक्यता आहे.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं प्रमुख व्याजदर असलेल्या रेपोदरात २५ बेसीक पॉईंटची कपात केली असून, रेपो दर आता सहा पूर्णांक २५ शतांश टक्के करण्यात आला आहे. बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी काल मुंबईत बँकेचा द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर केला. जागतिक पातळीवरच्या अस्थिर परिस्थितीचं कारण देत रिझर्व्ह बँकेनं काल आर्थिक वृद्धीदरांच्या अंदाजातही कपात केली. चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर सहा पूर्णांक चार दशांश टक्के राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

****

राज्यशासनाचे विविध वाङ्मय पुरस्कार काल जाहीर झाले. या वर्षासाठीचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार छत्रपती संभाजीनगर इथले ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब रंगराव उर्फ रा रं बोराडे यांना जाहीर झाला आहे. श्री.पु. भागवत पुरस्कार, पुण्याच्या ज्योत्स्ना प्रकाशनला, डॉ.अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार डॉ.रमेश सूर्यवंशी यांना आणि मंगेश पाडगावकर भाषा संवर्धन पुरस्कार भीमाबाई जोंधळे यांना जाहीर झाला आहे. मराठवाडा साहित्य परिषदेलाही भाषा संवर्धनासाठी मंगेश पाडगावकर भाषा संवर्धन पुरस्कार जाहीर झाला आहे.

इतर पुरस्कार प्राप्त मान्यवरांमध्ये रेखा बैजल यांना साने गुरूजी पुरस्कार, सुनीता सावरकर यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या २७ तारखेला मुंबईत हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. दरम्यान, नाशिक जिल्ह्यात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या शिरवाड या गावाला 'कवितांचे गाव' म्हणून, रत्नागिरी जिल्ह्यात कवी केशवसूत यांच्या मालगुंड या गावाला 'पुस्तकाचे गाव' म्हणून जाहीर करण्यात येणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

वीट भट्यासाठी मोकळया हायवामधून होणारी राखेची अवैध वाहतुक प्रदुषण वाढवणारी असून, ती वाहतुक बदं हायवामधून होईल याकडे संबधितांनी लक्ष घालून तसा अहवाल सादर करावा, अशा सूचना पर्यावरण आणि वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिल्या आहेत. त्या काल बीड इथं एका बैठकीत बोलत होत्या. चिमणीपासूनचं प्रदुषण नियत्रंणात असलं तरी राख उचलणे हे संबधित अधिका-यांचे कर्तव्य आहे, याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. राखेचे अनाधिकृत साठे सील करावेत, वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळावेत, राखेची वाहतुक मुख्य रस्त्यांवरून न करता ती बाह्य मार्गाने करावी, असंही मुंडे म्हणाल्या.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या अजिंठा नागरी सहकारी बँकेच्या ठेवीदारांच्या ९७ कोटी ४१ लाख रुपयांच्या गैरव्यवहारप्रकरणी काँग्रेसचे माजी विधान परिषद सदस्य आणि बँकेचे अध्यक्ष सुभाष झांबड यांना न्यायालयानं १२ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. झांबड यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्यांना न्यायालयासमोर हजर केलं, वर्षभराहून अधिक काळापासून झांबड फरार होते.

****

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ पन्नालाल पापडीवाल यांचं काल छत्रपती संभाजीनगर इथं निधन झालं, ते ९१ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर काल सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. महाराष्ट्र राज्य तीर्थक्षेत्र समितीच्या अध्यक्षपदासह विविध संस्थांवर महत्त्वाची पदं त्यांनी सांभाळली होती. आदिवासी समाजासाठी त्यांनी सुमारे दोन दशकं उल्लेखनीय कार्य केलं होतं.

****

नांदेड इथल्या साध्वी गार्गी देशपांडे यांचं काल हिमालयातल्या उत्तरकाशी इथे निधन झालं. त्या ७७ वर्षांच्या होत्या. नांदेड जिल्ह्यातल्या गोरठा मधल्या संत दासगणू प्रतिष्ठानमध्ये त्यांनी ४० वर्ष देवा केली. गार्गी देशपांडे यांच्या पार्थिव देहावर आज उत्तरकाशी इथे अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

परभणीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये काल प्रथमच देहदानाची नोंद झाली. शहरातील एका नागरीकाने आपल्या भावाच्या निधनानंतर त्यांचा देह

महाराष्ट्र ॲनाटोमी ऍक्ट अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला दान केला. दानात मिळालेल्या या मृतदेहांचा वैद्यकीय महाविद्यालयात शरीररचनाशास्त्र विभागातल्या विद्यार्थांना शिक्षणासाठी उपयोग होतो. परभणी जिल्ह्यात देहदानासंदर्भात जनजागृती सुरू असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या कौडगाव औद्योगिक वसाहतीत होवू घातलेल्या टेक्निकल टेक्स्टाईल पार्कमध्ये उद्योग उभारण्यासाठी इच्छुक उद्योजकांना राज्य सरकारच्या खास धोरणांचा मोठा लाभ होणार आहे, अशी माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. ते काल धाराशिव इथं बोलत होते. औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून देशातील नामांकित निर्यातदार कंपन्यांना गुंतवणुकीसाठी आमंत्रित करण्याबाबत वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी निर्णायक भूमिका घेतली असून, त्यामुळे दहा हजार रोजगार निर्मितीचे पहिल्या टप्प्यातील उद्दिष्ट आता सुकर झाले आहे, असं पाटील यांनी सांगितलं.

****

जालना जिल्ह्यातल्या शिधापत्रिका धारकांनी स्वस्त धान्याचा लाभ कायम रहावा यासाठी ई-केवायसी आणि मोबाईल सिडींग करुन घ्यावं, असं आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी केलं आहे. जिल्ह्यातल्या पाच लाख ६५ हजार लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रलंबित असून, ई केवायसी पूर्ण करून घेण्यासाठी गाव निहाय शिबीरं घेण्यात येत आहे. शिधापत्रिका धारकांनी या शिबिराचा लाभ घ्याव, असंही चौधर यांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्ह्यात १० फेब्रुवारीपासून हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीम सुरू केली जाणार आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी ही माहिती दिली.

****